Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। सोमवार, दि. ८ जून २०२६ । वर्ष १ । अंक ६३ । पाने २ ।
DIGITAL EDITION

कविराज संघेलिया यांना मानद डॉक्टरेट पुरस्कार
(पान २ वर)



Selected

### राम मंदिराच्या तिजोरीतून कोट्यवधी देणगी गायब?

लखनौ: अयोध्येतील राम मंदिराच्या दानपेटीत भाविकांनी अर्पण केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या देणगीत मोठा गैरव्यवहार झाला असून, ही रक्कम गायब झाल्याचा गंभीर आरोप समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी रविवारी केला आहे. हा प्रकार जगभरातील रामभक्तांसाठी अत्यंत धक्कादायक आणि मंदिर ट्रस्टसाठी 'लांछनास्पद' असल्याचे अखिलेश यांनी म्हटले आहेदरम्यान, या गंभीर आरोपांवर प्रतिक्रिया देताना 'श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'चे सदस्य महंत दिनेंद्र दास यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले, "आमचा प्रभू रामावर पूर्ण विश्वास आहे आणि आमचा कोणताही विश्वस्त असे कृत्य करणार नाही; तरीही यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केल्यास आमची कोणतीही हरकत नाही." ट्रस्ट कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास तयार असल्याचे महंत दिनेंद्र दास यांनी जाहीर केले आहे.

## वादळी पाऊस व वाऱ्यामुळे केळीसह विविध पिकांचे मोठे नुकसान

# शेती नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा!

### नुकसानग्रस्त भागातील परिस्थितीची गंभीर दखल घेत प्रशासनाला युद्धपातळीवर कार्यवाहीचे निर्देश

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव : जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे केळीसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेषतः मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली परिसर, रावेर तालुक्यातील अनेक गावे तसेच जिल्ह्यातील विविध भागांतील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले .**

असून या पार्श्वभूमीवर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हा प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.नुकसानग्रस्त भागातील परिस्थितीची गंभीर दखल घेत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नुकसानग्रस्त क्षेत्रांचा तातडीने सर्वेक्षण करून युद्धपातळीवर पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान, मुक्ताईनगरचे आमदार



चंद्रकांत पाटील यांनी अंतुर्ली परिसरातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पाहणीदरम्यान झालेल्या नुकसानीची सविस्तर माहिती त्यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांना दिली. यावेळी पालकमंत्र्यांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश देताना सांगितले की, कोणत्याही नुकसानग्रस्त शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. ज्या-ज्या भागांमध्ये केळी, फळबागा किंवा इतर शेती पिकांचे नुकसान झाले आहे, त्या सर्व ठिकाणी तातडीने पंचनामे करून अहवाल शासनाकडे सादर करण्यात यावा. कोणताही पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घेण्याचे आदेशही त्यांनी दिले. "संकटाच्या या कठीण काळात शासन आणि जिल्हा प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," असा विश्वास पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला.

#### शेतकऱ्यांना आवाहन

जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांच्या शेतीचे, फळबागांचे अथवा पिकांचे नुकसान झाले आहे, त्यांनी घाबरून न जाता तात्काळ संबंधित तलाठी, कृषी सहाय्यक, मंडळ अधिकारी किंवा ग्रामस्तरीय यंत्रणेशी संपर्क साधून नुकसानीची माहिती द्यावी, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले आहे. प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," असा विश्वास पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला. शासनाच्या निकषांनुसार मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून पंचनामे आणि मदतीच्या प्रक्रियेकडे जिल्ह्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## समृद्ध पंचायतराज अभियानात साकळी ग्रामपंचायतीची छाप

### दीपक पाटील यांच्या नेतृत्वाची प्रशंसा



**जन सम्राट टाईम्स**

**यावल | प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात यावल तालुक्यातील साकळी ग्रामपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी करत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला आहे. या यशानंतर ग्रामपंचायत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली असून, शासनाने नियुक्त केलेल्या जिल्हास्तरीय अधिकारी समितीने नुकतीच गावाला भेट देत विविध विकासकामांची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे, आरोग्य अधिकारी शकील शेख, विस्तार अधिकारी एन. टी. डोंगरे, जिल्हा समन्वयक संजय मारन तसेच सरगर यांचा समावेश होता. अधिकारी समितीच्या आगमनावेळी महिला भजनी मंडळाच्या स्वागतगीताने वातावरण भारावून गेले.
महिला ग्रामपंचायत सदस्यांनी औक्षण करून तसेच फुलांचा वर्षाव करत मान्यवरांचे स्वागत केले. ग्रामपंचायत कार्यालय आकर्षक सजावटीने नटले होते. सरपंच दीपक नागो पाटील आणि ग्रामपंचायत सदस्यांच्या हस्ते समिती सदस्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

#### ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीचे कौतुक

पाहणीदरम्यान समितीने ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद मराठी मुला-मुलींची शाळा, अंगणवाडी केंद्रे, पशुवैद्यकीय दवाखाना आदी शासकीय संस्थांना भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. विविध विभागांमध्ये राबविण्यात आलेले लोकाभिमुख उपक्रम, स्वच्छता, डिजिटल प्रशासन, सुविधा विकास आणि नागरिकांच्या सहभागातून उभारलेले आदर्श उपक्रम पाहून समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी साकळी ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीचे विशेष कौतुक केले.

## अनोरे गावात प्रथमच सत्यशोधक पद्धतीने दशपिंड व गंधमुक्ती कार्यक्रम

### अंधश्रद्धा आणि कर्मकांडापासून मुक्त व्हावे; सत्यशोधक विचारांची आज काळाला गरज – पी. डी. पाटील

**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील अनोरे गावात प्रथमच सत्यशोधक पद्धतीने दशपिंड व गंधमुक्ती कार्यक्रम पार पडला. निसर्गवासी लाडकाबाई तुकाराम महाजन यांच्या उत्तरकार्याचा विधी पारंपरिक कर्मकांडांना फाटा देत सत्यशोधक पद्धतीने करण्यात आला. या उपक्रमामुळे गावात सामाजिक प्रबोधनाचा संदेश पोहोचला असून उपस्थितांनी त्याचे स्वागत केले. अनोरे येथील तुकाराम सुकदेव महाजन यांच्या पत्नी तसेच माळी समाजाचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते रमेश महाजन आणि हरी महाजन यांच्या मातोश्री निसर्गवासी लाडकाबाई तुकाराम महाजन यांच्या स्मरणार्थ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात संत, महापुरुष आणि



महामाता यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर सत्यशोधक समाजाची प्रार्थना आणि विधी सत्यशोधक विधीकर्ते शिवदास महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी बोलताना सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील यांनी समाजाने अंधश्रद्धा, अवास्तव कर्मकांड आणि शोषणकारी प्रथांपासून मुक्त होण्याची गरज व्यक्त केली. सत्यशोधक विचारांच्या माध्यमातून समताधिष्ठित आणि शोषणमुक्त समाज निर्माण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजपरिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात माजी मुख्याध्यापक एम. एच. चौधरी आणि माजी सरपंच भगवान महाजन यांनी मनोगत व्यक्त करत निसर्गवासी लाडकाबाई महाजन यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. सत्यशोधक विधीची प्रेरणा सत्यशोधक समाज संघाचे अध्यक्ष अरविंद खैरनार आणि सचिव डॉ. सुरेश झाल्टे यांच्या मार्गदर्शनातून मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व नातेवाईक आणि मान्यवरांना महापुरुषांच्या विचारांवरील ग्रंथ तसेच सत्यशोधक समाजाची दिनदर्शिका भेट देण्यात आली. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी भामरे परिवाराच्या वतीने शेत परिसरात लिंब, पिंपळ आणि वड या वृक्षांची लागवड करण्यात आली.

## मनवेल ग्रामपंचायत जागेवर पक्क्या बांधकामाचा वाद

### काठेवाडी कुटुंबाला नोटीस;ग्रामस्थांची अतिक्रमण हटविण्याची मागणी

**जन सम्राट टाईम्स**

**यावल । प्रतिनिधी :** यावल तालुक्यातील मनवेल गावात ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर काठेवाडी कुटुंबाकडून पक्के बांधकाम सुरू करण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. संबंधित बांधकाम हे अतिक्रमण असल्याचा आरोप ग्रामस्थांनी करत ग्रामपंचायतीकडे तक्रार दाखल केली असून, हे बांधकाम तातडीने थांबवून जागा अतिक्रमणमुक्त करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काठेवाडी कुटुंब गेल्या सुमारे ४० वर्षांपासून मनवेल येथील माणकी शिवारात वास्तव्यास होते. मात्र सुमारे एक वर्षापूर्वी त्यांनी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या दगडी शिवारातील गट क्रमांक १/१ या जागेवर स्थलांतर केले. सुरुवातीला त्यांनी तेथे गवती छप्पर उभारून वास्तव्यास सुरुवात केली होती. संबंधित कुटुंबाने आता त्या जागेवर कायमस्वरूपी स्थायिक होण्याच्या उद्देशाने पक्क्या घरांचे बांधकाम सुरू केले आहे. ही जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याने अशा प्रकारचे बांधकाम नियमबाह्य असून त्यामुळे भविष्यात अतिक्रमणाचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार सादर करून सुरू असलेले बांधकाम तात्काळ थांबविण्याची मागणी केली आहे. गावातील सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असल्याने प्रशासनाने या प्रकरणात कठोर भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, मनवेल ग्रामपंचायतीनेही या प्रकरणाची दखल घेत संबंधित काठेवाडी कुटुंबाला नोटीस बजावली आहे. ग्रामपंचायतीच्या परवानगीशिवाय सुरू असलेले पक्के बांधकाम तातडीने थांबवावे, असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. याबाबत माहिती देताना ग्रामसेवक भरत पाटील यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर सुरू असलेल्या बांधकामाबाबत संबंधितांना नोटीस देण्यात आली असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया नियमांनुसार राबविण्यात येणार आहे.

#### काठेवाडी कुटुंबाला बजावली नोटीस

या प्रकरणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार सादर करून सुरू असलेले बांधकाम तात्काळ थांबविण्याची मागणी केली आहे. गावातील सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असल्याने प्रशासनाने या प्रकरणात कठोर भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, मनवेल ग्रामपंचायतीनेही या प्रकरणाची दखल घेत संबंधित काठेवाडी कुटुंबाला नोटीस बजावली आहे. ग्रामपंचायतीच्या परवानगीशिवाय सुरू असलेले पक्के बांधकाम तातडीने थांबवावे, असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

## फैजपूर-यावल परिसरात गारपीट, झाडे कोसळली!

### वादळी वाऱ्याचा तडाखा;





**जन सम्राट टाईम्स**

**यावल | प्रतिनिधी :** फैजपूर ते यावल परिसरात शनिवारी दुपारी अचानक हवामानात मोठा बदल होऊन जोरदार वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले. अवकाळी पावसामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली असून अनेक ठिकाणी झाडे कोसळणे, वीजपुरवठा खंडित होणे आणि शेती पिकांचे नुकसान अशा घटना घडल्या आहेत. प्राथमिक माहितीनुसार केळी, मका, भाजीपाला आणि इतर हंगामी पिकांना मोठा फटका बसला आहे. वादळी वाऱ्याचा सर्वाधिक परिणाम भुसावळ-रावेर महामार्गावर दिसून आला. डी. एन. कॉलेजसमोर एक मोठे झाड अचानक रस्त्यावर कोसळल्याने काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला. त्याचवेळी तेथून प्रवासी घेऊन जाणारी भुसावळ-रावेर बस त्या मार्गावरून जात होती. मात्र चालकाच्या सतर्कतेमुळे बस थोडक्यात बचावली आणि मोठी दुर्घटना टळली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सावदा शहरातील साईबाबा मंदिर परिसरातही जोरदार वाऱ्यामुळे एक भलेमोठे झाड कोसळले. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली. स्थानिक नागरिक आणि प्रशासनाच्या मदतीने झाड हटविण्याचे काम हाती घेण्यात आले. वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांवरील सोलर पॅनेल उडून गेल्याने नुकसान झाले आहे. लक्ष्मीनारायण नगर परिसरात एक मोठे लिंबाचे झाड वीजवाहिनीवर कोसळल्याने वीज खांब वाकला असून विद्युत तारा धोकादायक स्थितीत आल्या आहेत. परिणामी परिसरातील अनेक भागांचा वीजपुरवठा खंडित झाला. महावितरणचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे.

#### सुरक्षिततेची काळजी घ्यावी

नुकसानीचे प्रमाण मोठे असल्याने शेतकरी चिंतेत असून तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे. हवामानातील या अचानक बदलामुळे प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अनावश्यक प्रवास टाळावा, झाडांच्या किंवा वीजवाहिन्यांच्या जवळ थांबू नये तसेच सुरक्षिततेची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या अवकाळी पावसाने आणि गारपिटीने परिसरातील शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे केले असून नुकसानग्रस्तांना तातडीची मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हा प्रशासनानेही परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती उपाययोजना सुरू केल्याची माहिती मिळाली आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## ऑस्ट्रेलियाने उधळला झुरळ तस्करीचा मोठा डाव!

### एक लाख दुर्मिळ विदेशी झुरळे जप्त; देशाच्या इतिहासातील सर्वात मोठी जैव-सुरक्षा कारवाई

**जन सम्राट टाईम्स**

**कॅनबेरा | प्रतिनिधी :** ऑस्ट्रेलियाच्या सीमा सुरक्षा यंत्रणेने आंतरराष्ट्रीय तस्करांच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करत तब्बल एक लाख जिवंत आणि दुर्मिळ झुरळे जप्त केली आहेत. विदेशी कीटकांच्या बेकायदेशीर आयातीविरोधातील ही कारवाई ऑस्ट्रेलियाच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात मोठी आणि विक्रमी मोहीम मानली जात आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या कीटकांमध्ये प्रामुख्याने 'दुबिया कॉक्रोच' (Dubia Cockroach) आणि 'मादागास्कर हिंसिंग कॉक्रोच' (Madagascar Hissing Cockroach) या दुर्मिळ व विदेशी प्रजातींचा समावेश आहे. यापैकी मादागास्कर हिंसिंग कॉक्रोच ही प्रजाती शिट्टीसारखा आवाज काढण्याच्या वैशिष्ट्यासाठी जगभर प्रसिद्ध आहे, तर दुबिया कॉक्रोच आकाराने मोठी असल्याने विदेशी प्राणीपालक आणि संग्राहकांमध्ये तिची मोठी मागणी आहे. ऑस्ट्रेलियामध्ये जैव-सुरक्षा आणि पर्यावरण संरक्षणासंदर्भात अत्यंत कडक नियम लागू आहेत. देशातील स्थानिक वन्यजीव, शेती आणि परिसंस्थेचे संरक्षण करण्यासाठी परदेशी प्राणी, कीटक किंवा वनस्पतींच्या आयातीवर कठोर नियंत्रण ठेवले जाते. त्यामुळे या विदेशी झुरळांची मोठ्या प्रमाणावर होणारी तस्करी प्रशासनासाठी गंभीर चिंतेचा विषय ठरली



होती. सीमा सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे कीटक देशात पसरल्यास स्थानिक जैवविविधतेला धोका निर्माण होऊ शकतो. तसेच कृषी क्षेत्रावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. अनेक विदेशी प्रजाती स्थानिक पर्यावरणात वेगाने वाढतात आणि त्यामुळे नैसर्गिक संतुलन बिघडण्याचा धोका असतो. प्राथमिक तपासात या प्रकरणामागे विदेशी कीटकांची आंतरराष्ट्रीय स्तरावर खरेदी-विक्री करणाऱ्या संघटित तस्करांच्या जाळ्याचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सुरक्षा यंत्रणा या रॅकेटचे आंतरराष्ट्रीय संबंध, आर्थिक व्यवहार आणि तस्करीचे मार्ग यांचा सखोल तपास करत आहे. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, जप्त करण्यात आलेली सर्व झुरळे जैव-सुरक्षेच्या नियमांनुसार नष्ट करण्यात येणार आहेत. तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या संशयितांविरोधात कठोर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या कारवाईमुळे ऑस्ट्रेलियाच्या सीमा सुरक्षा यंत्रणेची सतर्कता पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून देशाच्या पर्यावरण आणि कृषी सुरक्षेसाठी जैव-सुरक्षा उपाययोजना किती महत्त्वाच्या आहेत, हे स्पष्ट झाले आहे.

#### नैसर्गिक संतुलन बिघडण्याचा धोका

कृषी क्षेत्रावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. अनेक विदेशी प्रजाती स्थानिक पर्यावरणात वेगाने वाढतात आणि त्यामुळे नैसर्गिक संतुलन बिघडण्याचा धोका असतो. प्राथमिक तपासात या प्रकरणामागे विदेशी कीटकांची आंतरराष्ट्रीय स्तरावर खरेदी-विक्री करणाऱ्या संघटित तस्करांच्या जाळ्याचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सुरक्षा यंत्रणा या रॅकेटचे आंतरराष्ट्रीय संबंध, आर्थिक व्यवहार आणि तस्करीचे मार्ग यांचा सखोल तपास करत आहे. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, जप्त करण्यात आलेली सर्व झुरळे जैव-सुरक्षेच्या नियमांनुसार नष्ट करण्यात येणार आहेत. तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या संशयितांविरोधात कठोर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यानात घाणीचे साम्राज्य!

## आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर; महापालिकेच्या दुर्लक्षामुळे कचऱ्याचे ढीग

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव शहरातील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यान परिसरात सध्या घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र दिसून येत आहे. कचऱ्याचे ढीग, प्लास्टिक कचरा, साचलेली घाण आणि अस्वच्छ वातावरणामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून जळगाव महानगरपालिकेच्या दुर्लक्षाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील नागरिकांसाठी विरंगुळ्याचे आणि सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी महत्त्वाचे ठिकाण असलेल्या या उद्यानाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. उद्यान परिसरात अनेक ठिकाणी कचरा साचलेला असून त्याची नियमित विल्हेवाट लावली जात नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरत असून मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचाही वावर वाढला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, उद्यान आणि परिसरातील काही भागात साफसफाई नियमित होत नसल्यामुळे डासांची उत्पत्ती वाढत आहे. त्यामुळे सर्दी, खोकला, ताप तसेच इतर संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना या परिस्थितीचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांनी अनेक वेळा जळगाव महानगरपालिकेकडे तक्रारी करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याची खंत व्यक्त केली आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांची कमतरता, अपुरी यंत्रणा आणि देखरेखीचा अभाव यामुळे कचरा व्यवस्थापनाची समस्या अधिक गंभीर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, नागरिकांनी महापालिकेकडे उद्यान परिसराची नियमित स्वच्छता, कचरा



संकलनासाठी प्रभावी व्यवस्था, पुरेशा कचरापेट्यांची उपलब्धता आणि परिसरात जनजागृती मोहीम राबविण्याची मागणी केली आहे. तसेच उद्यान परिसरात स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या उद्यानाची स्वच्छता आणि देखभाल राखणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. संबंधित यंत्रणेने तातडीने दखल घेऊन स्वच्छता मोहिम राबवावी, अन्यथा नागरिकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या उद्यानाचे वैभव टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### कचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर

शहरातील नागरिकांसाठी विरंगुळ्याचे आणि सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी महत्त्वाचे ठिकाण असलेल्या या उद्यानाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. उद्यान परिसरात अनेक ठिकाणी कचरा साचलेला असून त्याची नियमित विल्हेवाट लावली जात नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरत असून मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचाही वावर वाढला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, उद्यान आणि परिसरातील काही भागात साफसफाई नियमित होत नसल्यामुळे डासांची उत्पत्ती वाढत आहे. त्यामुळे सर्दी, खोकला, ताप तसेच इतर संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. या परिस्थितीचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांनी अनेक वेळा जळगाव महानगरपालिकेकडे तक्रारी करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याची खंत व्यक्त केली आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांची कमतरता, अपुरी यंत्रणा आणि देखरेखीचा अभाव यामुळे कचरा व्यवस्थापनाची समस्या अधिक गंभीर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

---

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# कविराज संघेलिया यांना मानद डॉक्टरेट पुरस्कार

## सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव

जन सम्राट टाईम्स



**पुणे। प्रतिनिधी:** विविध क्षेत्रांत नाविन्यपूर्ण कार्य आणि उत्कृष्ट नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणाऱ्या उदयोन्मुख अचिव्हर्स अवार्ड कौन्सिल या प्रतिष्ठित संस्थेतर्फे सामाजिक कार्यकर्ते कविराज संघेलिया यांना मानद डॉक्टरेट पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. गेल्या चार दशकांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या कविराज संघेलिया यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवेत मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला. कविराज संघेलिया यांनी पुणे महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीवर दोन वेळा सदस्य म्हणून काम केले असून, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मागासवर्गीय विभागात जनरल सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. समाजहितासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांना यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार तसेच वाल्मिकी समाजभूषण पुरस्कार यांसारख्या विविध सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. सध्या ते भारत वीर रत्नसिंह चावरिया प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून सामाजिक बांधिलकी जपत विविध लोककल्याणकारी उपक्रम राबवत आहेत. मानद डॉक्टरेट पुरस्कार जाहीर झाल्यानंतर पुणे शहरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# धुळ्यात आदिवासी समाज जनजागृती मेळावा

## सामाजिक एकता जपण्याचे आवाहन



जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी :** धुळे येथे दिनांक ५ जून २०२५ रोजी आदिवासी समाज जनजागृती मेळाव्याचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या मेळाव्यात विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमादरम्यान विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी आपापली मते मांडत समाजातील शिक्षण, संघटनात्मक बळकटी, सामाजिक प्रगती आणि एकी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांनी समाजातील युवकांनी सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची गरज अधोरेखित केली. या मेळाव्यात मा. भवरलाल दादा परमार आणि सतीश दादा पेदाम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी आपल्या भाषणात आदिवासी समाजाने आपल्या रुढी-परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपत समाजातील एकता अधिक दृढ करण्यासाठी संघटितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच येणाऱ्या काळात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने सामाजिक चळवळींमध्ये सहभागी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी आदिवासी टायगर सेना यांच्या वतीने मा. भवरलाल दादा परमार, सतीश दादा पेदाम तसेच मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या आयोजकांचा सत्कार करण्यात आला.

### चळवळींमध्ये सहभागी होणे आवश्यक

आपल्या भाषणात आदिवासी समाजाने आपल्या रुढी-परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपत समाजातील एकता अधिक दृढ करण्यासाठी संघटितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच येणाऱ्या काळात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने सामाजिक चळवळींमध्ये सहभागी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

---

# सातपुड्यात जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्काम; समस्या जाणून घेत दिले तातडीचे निर्देश

## लंगडाआंबा गावांना भेट; विकासकामांचा घेतला आढावा

जन सम्राट टाईम्स

**यावल। प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सातपुडा पर्वतरांगांतील दुर्गम आदिवासी भागात प्रत्यक्ष मुक्काम करून आदिवासी बांधवांच्या समस्या जाणून घेतल्या. गुरुवार, दि. ४ जून रोजी महसूल, वन व इतर विभागांच्या अधिकाऱ्यांसह त्यांनी यावल तालुक्यातील जामन्या, गाडऱ्या, उसमळी आणि लंगडाआंबा या गावांना भेट देत विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. जिल्हाधिकाऱ्यांसोबत नाशिक वनपरिक्षेत्र अधिकारी भवर, यावल तहसीलदार मोहनमाला नाझीरकर, रावेर तहसीलदार दीपा जेधे, वनक्षेत्रपाल दुसाने, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. संध्याकाळी जामन्या येथील वनविभागाच्या प्रांगणात आयोजित बैठकीत ग्रामस्थांनी आपल्या समस्या थेट जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. बैठकीत स्वस्त धान्य दुकानांची कार्यपद्धती, जामन्या आरोग्य उपकेंद्रातील सुविधा, पाल-माथन व वाघझिरा-लंगडाआंबा रस्त्यांची अपूर्ण कामे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शेतरस्ते, रोजगार हमी योजना, बांबू, डिंक व चारोळी उद्योगांना चालना, सिंचन सुविधा, कृषी योजना, शबरी योजनेअंतर्गत स्पाइस क्लस्टर, घरकुल योजना तसेच आधार सीडिंगमुळे प्रलंबित असलेले घरकुल प्रस्ताव आदी विषयांवर चर्चा झाली. ग्रामस्थांनी गावांमध्ये 'आपले सरकार सेवा



केंद्र' उपलब्ध करून देण्याची तसेच कुसुम सोलर योजनेअंतर्गत अपूर्ण राहिलेले साहित्य वाटप पूर्ण करण्याची मागणी केली. यावर जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी चारही गावांसाठी संयुक्त सेवा केंद्र उपलब्ध करून देणे, रस्ते प्रश्न मार्गी लावणे आणि संपूर्ण परिसर सौरऊर्जायुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी जामन्या येथील आरोग्य उपकेंद्र, स्वस्त धान्य दुकान, आश्रमशाळा तसेच पाझर तलाव येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. शाळेतील शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत इमारतीच्या दुरुस्तीबाबत सकारात्मक भूमिका घेतली. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लंगडाआंबा विश्रामगृह परिसरात आदिवासी बांधव, महसूल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सीताफळासह विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच वनविभागाने राबविलेल्या वृक्षलागवड व संवर्धन प्रकल्पांचीही पाहणी करण्यात आली. यावेळी लंगडाआंबा, उसमळी आणि जामन्या येथे बसविण्यात आलेल्या बीएसएनएल मोबाईल टॉवरचीही प्रत्यक्ष पाहणी करून नेटवर्क सुविधेची चाचणी घेण्यात आली. दुर्गम भागातील नागरिकांना अधिक चांगल्या दूरसंचार सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. दौऱ्याच्या शेवटी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सातपुडा परिसरातील प्रलंबित प्रश्नांचा पुन्हा आढावा घेण्यासाठी येत्या एक ते दीड महिन्यात पुनर्भेट देण्याचे आश्वासन दिले.

### इमारती दुरुस्तीबाबत सकारात्मक भूमिका

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी चारही गावांसाठी संयुक्त सेवा केंद्र उपलब्ध करून देणे, रस्ते प्रश्न मार्गी लावणे आणि संपूर्ण परिसर सौरऊर्जायुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी जामन्या येथील आरोग्य उपकेंद्र, स्वस्त धान्य दुकान, आश्रमशाळा तसेच पाझर तलाव येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. शाळेतील शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत इमारतीच्या दुरुस्तीबाबत सकारात्मक भूमिका घेतली.

---

# बार कौन्सिल निवडणुकीत ॲड. पारिजात पांडे यांचा ऐतिहासिक विजय

## २२ वर्षांनंतर विक्रम; पहिल्याच फेरीत पूर्ण केला मतांचा कोटा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। प्रतिनिधी :** बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाच्या २५ जागांसाठी झालेल्या अत्यंत चुरशीच्या निवडणुकीची मतमोजणी सुरू झाली आहे. या निवडणुकीत नागपूरचे ॲड. पारिजात पांडे यांनी ऐतिहासिक विजय संपादन करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. तसेच, सिंधुदुर्गचे ॲड. संग्राम देसाई आणि सोलापूरचे ॲड. मिलिंद थोबडे हे देखील बहुमताने विजयी झाले आहेत.

उपलब्ध माहितीनुसार, यंदाच्या निवडणुकीचे मुख्य आकर्षण ठरले ते नागपूरच्या ॲड. पारिजात पांडे यांचे घवघवीत यश. त्यांनी विजयासाठी निर्धारित असलेला सुमारे ३,६८३ मतांचा कोटा मतमोजणीच्या पहिल्याच फेरीत पूर्ण केला. २००४ सालानंतर प्रथमच एखाद्या उमेदवाराने इतक्या मोठ्या फरकाने आणि पहिल्याच फेरीत बाजी मारण्याचा ऐतिहासिक विक्रम आपल्या नावे केला आहे. पारिजात पांडे यांच्या ऐतिहासिक विजयासोबतच सिंधुदुर्ग जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारे ॲड. संग्राम देसाई यांनीही या निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी नोंदवत बहुमताने विजय संपादन केला आहे.

### मतदान प्रक्रिया आणि निकष

बार कौन्सिलची ही निवडणूक 'प्रथम पसंती' या अत्यंत पारदर्शक अशा मतदान पद्धतीनुसार पार पडली. या निवडणुकीत मतदानासाठी विशिष्ट निकष अनिवार्य करण्यात



आले होते. ज्या वकिलांनी 'सनद' प्राप्त केली आहे, केवळ त्यांनाच या प्रक्रियेत मतदान करण्याचा अधिकार देण्यात आला होता.

### १ लाख ९० हजार वकिलांचा सहभाग

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा ही देशातील सर्वात मोठ्या बार कौन्सिल्सपैकी एक मानली जाते. या निवडणुकीत महाराष्ट्र, गोवा आणि दिव-दमण या क्षेत्रांतील तब्बल १ लाख ९० हजार वकिलांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या मोठ्या सहभागामुळेच यंदाची निवडणूक अत्यंत अटीतटीची आणि चुरशीची ठरली.

### असा मिळाला विजय

महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल निवडणुकीच्या मतमोजणीत एकूण झालेल्या वैध मतदानाचा विचार करता यंदा ३,६८३ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला आहे. पहिल्याच फेरीपासून ॲड. पारिजात पांडे यांनी आपले वर्चस्व कायम राखले. प्रथम पसंतीच्या मतांची मोजणी पूर्ण झाली तेव्हा त्यांनी कोट्याचा आकडा पार करत ३,७२६ मते मिळवली आहेत व ते विजयी झाले आहेत. या विजयाला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. यापूर्वी सन २००४ च्या बार कौन्सिल निवडणुकीत ॲड. अनिरुद्ध चौबे यांनी प्रथम पसंतीच्या मतांचा कोटा पूर्ण करून थेट विजय मिळवला होता. त्यानंतर तब्बल २२ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर असा चमत्कार घडवून आणण्याचा मान ॲड. पारिजात पांडे यांनी मिळवला आहे. पहिल्याच फेरीत कोटा पूर्ण करून निवडून येण्याची ही कामगिरी वकील वर्तुळात प्रचंड कौतुकाचा विषय ठरत आहे.

ॲड. पारिजात पांडे यांच्या या विजयाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांना केवळ एका विशिष्ट भागातून नाही, तर संपूर्ण कार्यक्षेत्रातून वकिलांचा कौल त्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्वच्या सर्व ३६ जिल्ह्यांमधील सुमारे १४४ पेक्षा जास्त तालुक्यांमधून ॲड. पारिजात पांडे यांना प्रथम पसंतीची मते मिळाली. तसेच गोवा राज्यात व केंद्रशासित प्रदेश दीव, दमण आणि दादरा नगर हवेली येथूनही त्यांना मतदारांनी प्रथम पसंती दिली आहेत. थोडक्यात दिव-दमण पासून ते गडचिरोलीच्या सिरोंचा पर्यंत, गोवा व कोकणातल्या सावंतवाडी पासून ते विदर्भातल्या गोंदिया पर्यंत ॲड. पारिजात पांडे यांना सर्वत्रच भरघोस मते मिळाली आहेत. आपल्याला बार कौन्सिल सदस्य म्हणून मिळणाऱ्या अधिकारांचा पूर्ण उपयोग वकील वर्गाच्या सर्वांगीण हितासाठी सर्व शक्तीनिशी करण्यासाठी तत्पर असेन अशीच प्रतिक्रिया निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळाल्यानंतर देखील ॲड. पारिजात पांडे यांनी व्यक्त केली आहे.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# धुळ्यात युवासेना आयोजित 'सडेतोड' राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

## राज्यातील ३० वक्त्यांचा सहभाग; १० जून रोजी नाशिक येथे होणार पुढील फेरी

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** युवासेना धुळे जिल्ह्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'सडेतोड' राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२६ मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडली. राज्यभरातून आलेल्या ३० कसलेल्या वक्त्यांनी विविध सामाजिक, राजकीय आणि समकालीन विषयांवर अभ्यासपूर्ण व सडेतोड मते मांडत उपस्थितांची मने जिंकली. चुरशीच्या या स्पर्धेत शेख एहतेशाम इम्तियाज यांनी प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपदावर



आपले नाव कोरले.

स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना उपनेत्या शुभांगीताई पाटील, ज्येष्ठ पत्रकार सुनीलभाऊ पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख अतुलभाऊ सोनवणे, उपजिल्हाप्रमुख न्हानूभाऊ परदेशी, निंबा नाना मराठे आणि महिला आघाडी संघटिका जयश्रीताई वानखेडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन आणि संयोजन युवासेना धुळे जिल्हा युवाधिकारी कुणाल कानकाटे यांनी केले. स्पर्धेतील प्रत्येक सहभागीने प्रभावी वक्तृत्वशैली आणि विषयावरील सखोल अभ्यासाच्या जोरावर आपली छाप पाडली. त्यामुळे परीक्षकांसमोर विजेत्यांची निवड करणे आव्हानात्मक ठरले. ज्येष्ठ पत्रकार सुनीलभाऊ पाटील, जयश्रीताई वानखेडे आणि निंबा नाना मराठे यांनी परीक्षक म्हणून निष्पक्ष व काटेकोर मूल्यमापन करत अंतिम निकाल जाहीर केला.जिल्हास्तरीय फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या स्पर्धकांची निवड पुढील राज्यस्तरीय मुख्य फेरीसाठी करण्यात आली असून, ही स्पर्धा १० जून रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे विजेत्यांमध्ये नव्या फेरीसाठी उत्साहाचे वातावरण आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी कापली लिंगायत, अण्णा फुलपगारे, जयेश नाईक, ओम कानकाटे, हर्षल मेंढे, ओम पाकळे, सनी गायकवाड, दादू गवळी, कृष्णा माळी, भावेश शार्दुल, श्री बागुल, पियुष शिरसाठ, दक्ष पाटील, तुषार पाटील, सोमेश कानकाटे यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक आणि अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेच्या माध्यमातून युवा वक्त्यांना आपले विचार प्रभावीपणे मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले असून, धुळे जिल्ह्यातील या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

---

# मंत्री जरी चुकत असेल तरी ठोकून काढा : बच्चू कडू

जन सम्राट टाईम्स

**अमरावती | प्रतिनिधी :** प्रहार जनशक्ती पक्षातून शिवसेना शिंदे गटात नुकत्याच प्रवेश केलेल्या बच्चू कडू यांनी आपल्याच पक्षाला आणि त्यांच्या मंत्र्यांना घरचा आहेर दिला आहे. "आपल्याच पक्षाचा मंत्री जरी चुकत असेल, तरी त्याला ठोकून काढा आणि जनतेच्या बाजूने उभे राहा," असे थेट आणि आक्रमक आवाहन बच्चू कडू यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले आहे. अमरावती येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. बच्चू कडू यांच्या या विधानाची आता राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. बच्चू कडू यांनी आपल्या भाषणात मंत्र्यांच्या आणि प्रशासनाच्या कामकाजावर तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, सत्ता ही जनतेची कामे करण्यासाठी असते, केवळ पदांचा उपभोग घेण्यासाठी नाही. जर आपलेच मंत्री सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरत असतील किंवा त्यांच्याकडून काही चुका होत असतील, तर कार्यकर्ते मूग गिळून गप्प बसणार नाहीत. सत्तेत असूनही प्रशासकीय अनागोंदी आणि भ्रष्टाचाराविरोधात आपली आक्रमक शैली कायम राहील, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. अमरावती आणि परिसरात महायुतीमधील घटक पक्षांमध्ये स्थानिक मुद्द्यांवरून आधीच तणाव असताना, कडू यांच्या या विधानामुळे शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांमध्ये आणि मंत्र्यांमध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे.